## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या मोकाट जनावरांच्या त्रासाबाबत अनेक तक्रारी पशुसंवर्धन विभागास प्राप्त होत असल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक **श्री. संजय श्रीपतराव काटकर,भा.प्र.से** यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील तबेलेधारकांची व गौ-सेवक यांची बैठक मंगळवार दि.16/07/2024 रोजी दुपारी 12.00 वा. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) मांडली तलाव, भाईंदर (प.) येथे आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये **मा. अति-आयुक्त-डॉ संभाजी पानपट्टे, मा. उपायुक्त-रवि पवार** (**पशुसंवर्धन**), **पशुवैद्यकीय अधिकारी- डॉ विक्रम निराटले** उपस्थित होते.

मा. अति-आयुक्त डॉ संभाजी पानपट्टे यांनी मार्गदर्शन करतांना तबेलाधारकांना व गाय रस्त्यावर बांधुन व्यवसाय करणाऱ्यांना (गौ-सेवक) यांना मिरा भाईंदर शहर स्वच्छता अभियांना अंतर्गत मोकाट जनावरांना खाऊ घालण्यात येणारा भुसा व चारा या व्यतिरिक्त दुसरे अन्य काही देण्यात येवु नये जेणेकरुन जनावरांचे आरोग्य व्यवस्थित राहील अशी सुचना देण्यात आली.

मा. उपायुक्त रवि पवार यांनी शहरात फक्त देशी गायी बांधण्यात याव्यात व तबेल्यातुन जनावरांची ने-आन करतांना गौ-सेवकांनी स्वत: जनावरांसोबत राहुन दक्षता घ्यावी, जनावरे रस्त्यावर बांधल्यानंतर जमिनीवर ताडपत्री ठेवण्यात यावी जेणेकरुन चारा , भुसा व शेण याच्यामुळे होणाऱ्या अस्वच्छतेबाबत सुचना करण्यात आल्या .

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ विक्रम निराटले यांनी आजारी गायीना व लहान वासरांना बांधण्यात येवु नये तसेच मोकाट सोडण्यात येवु नये याबाबत मार्गदर्शन केले.

आयोजित बैठकीत श्री मच्छिंद्र भोसले (राष्ट्रीय अध्यक्ष, भटक्या विमुक्त संघटना) , श्री अनिल इंगोळे (सिध्दनाथ गौ-सेवक सेवक संघटना), श्री भागवत सांळुखे (पत्रकार) उपस्थित होते.

**(रवि पवार)**
**उपायुक्त (प.सं.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**